# <u>प्रेसनोट</u>

## <u>खंडणी विरोधी पथकाकडून मार्केटयार्ड भागात दोन गावठी कट्टे व एक काडतुस जप्त</u>

दि. ०७/१२/२०१७ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मार्केटयार्ड शेवटचा बसस्टॉपजवळ आले असता, पथकातील पोलीस हवालदार एकनाथ कंधारे व पोलीस नाईक प्रदिप शिंदे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक बिहारी इसम आंबेडकर वसाहतजवळ उभा असून, त्याने विक्रीसाठी दोन गावठी कट्टे व जिवंत काडतुसे आणलेली आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, यांचे दिमतीत खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल शेलार व स्टाफने सापळा रचुन प्रविणकुमार शिवदयाल सिंह वय २० वर्ष रा. ग्राम नहरीचांदी, तहसील अरबन जि.आरा (बिहार राज्य ) सध्या पुणे फिरस्ता यांस पकडून त्याचे कब्जातुन दोन गावठी कट्टे व एक जिवंत काडतूसे असे किं.रुपये २०,१००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहेत. सदरबाबत मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. २३८/१७ आर्म ॲक्ट कलम ३,२५ सह म.पो.का.क. ३७(१) १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वरील कारवाई ही श्री. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, पुणे श्री. समिर शेख सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार, व पोलीस स्टाफ एकनाथ कंधारे, प्रदिप शिंदे, अविनाश मराठे, शिवाजी घुले, रमेश गरूड, संतोष मते, सुधीर इंगळे, मंगेश पवार यांनी केलेली आहे.**